# भारतातील राजकीय प्रक्रिया आणि लोकशाही पुढील आव्हाने

**प्रा.डॉ.रवींद्र पांडुरंग भणगे** (राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.)

---

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देश म्हणून आपण एका मोठ्या आव्हानाचा स्वीकार करत होतो ते आव्हान म्हणजे लोकशाही निर्मितीचे व ती टिकविण्याचे आव्हान होय. अवघी पंधरा टक्के साक्षर लोकसंख्या, दारिद्र्य, पायाभूत सुविधांचा अभाव, शैक्षणिक संस्थांचा अभाव, आरोग्य व्यवस्थेचा अभाव, कमकुवत न्यायालयीन व्यवस्था, सामाजिक विषमता, स्त्री-पुरुष असमानता, जातीय तेढ, धार्मिक तणाव, प्रादेशिकतावाद, जमातवाद अशा अनेक समस्या समोर असताना लोकशाही राजकीय व्यवस्था स्वीकारण्याचं धारिष्ट तत्कालीन सामूहिक नेतृत्वाने दाखवले व संविधान निर्मितीच्या माध्यमातून ती यशस्वीरित्या पेललो याबद्दल आपल्या कोणाच्याही मनामध्ये शंका नाही. स्वतंत्र भारतामध्ये लोकशाही व्यवस्था रुजवण्यासाठी जे जे संस्थात्मक व व्यक्तिगत प्रयत्न झाले ते सर्व प्रयत्न लोकशाही व्यवस्थेच्या बळकटीकरणाला आधार देणारे ठरले.

तत्कालीन नेतृत्वासमोर म्हणजेच भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासमोर जेवढे अवघड काम होते तेवढे कोणत्याही आधुनिक आधुनिक नेतृत्वासमोर नव्हते असे म्हणता येईल. आधी नमूद केल्याप्रमाणे मला असे वाटते की त्यांनी अशा देशाचे नेतृत्व स्वीकारले होते की ज्या देशासमोर भयानक समस्या आ वासून उभ्या होत्या. त्यांना दंगली विझवायच्या होत्या, अन्नधान्याचा तुटवडा दूर करायचा होता, ६०० हून अधिक संस्थानचं विलनीकरण करून त्यांना भारतामध्ये सामावून घ्यायचं होतं, कोट्यवधी निर्वासितांचे पुनर्वसन करायचे होते आणि हे सर्व करण्यासाठी अतिशय कमी वेळ त्यांच्याकडे होता. तरी देखील हे मोठे आव्हान त्यांनी यशस्वीपणे स्वीकारले व देशाला योग्य दिशेला घेऊन जाण्याचे काम त्यांनी केले हे प्रत्येकाला मान्य करावेच लागेल. जगाच्या इतिहासात अशा बिकट परिस्थितीमध्ये कोणतेही राष्ट्र इतक्या कार्यक्षमपणे उभे राहिल्याचे उदाहरण आपल्याला ठामपणे सांगता येणार नाही. सुदैवाने नेहरूंना सक्षम, कर्तृत्ववान असे सहकारी लाभल्यामुळे इतके आव्हानात्मक व गुंतागुंतीचे काम प्रभावीपणे पार पाडता आले हेही नमूद करणे आवश्यक आहे. त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये वल्लभभाई पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजगोपालचारी, मौलाना आझाद, राजेंद्र प्रसाद असे अनेकजण सामील होते. या सर्वांनी भारतीय लोकशाहीचा पाया घातला व भारतीय संविधानाच्या मूल्यांप्रमाणे भारतीय लोकशाहीची वाटचाल सुरू झाली असे म्हणता येईल.

लोकशाही व्यवस्था ही एक कृत्रिम राजकीय व्यवस्था जरी असली तरी मानवी मूल्यांना सर्वोच्च प्राधान्य देणारी उपलब्ध राजकीय व्यवस्थे पैकी लोकशाही ही एकमेव राजकीय व्यवस्था आहे. लोकशाहीमध्ये व्यक्तीच्या राजकीय मूल्यापेक्षाही सामाजिक व आर्थिक मूल्यांना अतिशय महत्त्व आहे.

भारत ही जगातील सर्वात जास्त लोकसंखेचा लोकशाही व्यवस्था असलेला देश आहे. भारतीय लोकशाही व्यवस्था ही लोकशाही मूल्यांचे जतन आणि संवर्धन करते. इथे सार्वत्रिक निवडणुका, प्रौढ मतदान, मूलभूत अधिकार, कायद्याचे राज्य आणि कार्यकारी मंडळ, कायदे मंडळ आणि न्याय मंडळ यांचे स्वातंत्र्य अबाधित आहे. आपली लोकशाही व्यवस्था सामाजिक न्याय आणि समानतेला प्रोत्साहन देते. इथे सर्व नागरिकांना समान अधिकार आणि संधी यांची तरतूद आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेने देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. जगभरातील विचारवंतांच्या मते भारतीय लोकशाही व्यवस्था ही जगासमोर आदर्श निर्माण करणारी आहे . भारताच्या लोकशाहीचा इतिहास हजारो वर्षांपूर्वीपासून सुरू होतो. प्राचीन भारतात अनेक लोकशाही तत्त्वे आणि संस्था अस्तित्वात होत्या. लोकशाहीच्या या प्राचीन परंपरेमुळेच भारताला लोकशाहीची जननी मानले जाते.

**भारतीय लोकशाहीचा उदय व विकास :**

प्राचीन काळापासून आजपर्यंत भारत लोकशाही तत्त्वे आणि लोकशाही संस्थांनी आकाराला आला आहे. त्याच तत्वे व संस्थानी भारताच्या प्रगतीचा आणि सर्वसमावेशकतेचा पाया घातला आहे.भारतातील लोकशाही तत्त्वे आणि परंपरांचे सर्वात जुने स्त्रोत म्हणजे सिंधू संस्कृती, ऋग्वेद काळखंड, महाजन पदांचा काळखंड, संगम कालखंड होय. नंतर उत्तरमेरू आणि अनुभव मंटपाची उदाहरणे भारताच्या समृद्ध लोकशाही परंपरेचे पुरावे आहेत,ज्यात सर्वसमावेशक शासन, सहभागात्मक निर्णय घेणे आणि संवादाच्या सामर्थ्यावर जोर देण्यात आला आहे. या ऐतिहासिक उदाहरणांचा आणि त्यांच्या परिणामांचा शोध घेतल्यास भारताच्या लोकशाही परंपरेचा वारसा उलगडत जातो जो आजही देशाच्या वाटचालीला सतत मार्गदर्शन करत आहे. महाभारत, पाणिनीच अष्टाध्यायी आणि बौद्ध धर्मग्रंथांमधील "गण" आणि "संघ" अशा संकल्पनांच्या उल्लेखांतून भारताचा लोकशाही वारसा त्याच्या प्राचीन इतिहासामध्ये स्पष्टपणे दिसतो.

सिंधू संस्कृती ही भारतातील सर्वात प्राचीन संस्कृती मानली जाते. या संस्कृतीतील नगरराज्यांमध्ये लोकशाही तत्त्वे अस्तित्वात होती. त्यावेळी लोकशाही मूल्यांना अनुसरून राजकीय संस्था निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. आपल्या नगरासमोरील प्रश्न सोडवण्यासाठी लोक एकत्रित येवून चर्चा करत असत व आपल्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीला निर्णय घेण्याचे अधिकार सुपूर्द करत असत. सिंधु संस्कृती मध्ये स्त्री- पुरुष समतेचे तत्त्व मान्य केल्याचे दिसते. व्यक्तीला आपले मत खुलेपणाने मांडण्याचा अधिकार होता यावरून असे दिसते की व्यक्तीस्वातंत्र्याच्या मूल्याची रुजुवात या काळात केली गेली.

ऋग्वेदकालीन भारतातही लोकशाही तत्त्वे अस्तित्वात होती. या काळात पंचायती व्यवस्था ही एक लोकशाही संस्था होती. पंचायती व्यवस्था ही गावातील लोकांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था होती व वैदीक काळामध्ये सभा, समिती अशा राजकीय संस्था अस्तित्वात होत्या जिथे लोक एकत्र येवून राजकीय निर्णय करत असत. याच सभा, समिती च्या माध्यमातून राजाची निवड केली जात असे. या व्यवस्थेच्या माध्यमातून कर यंत्रणा राबविली जात असे. गावचे रक्षण करण्यासाठी राजाला कररूपी मोबदला दिला जात असे त्याला 'बली' म्हंटले जात. यावरून असे लक्षात येते की आधुनिक लोकशाही व्यवस्थेमध्ये असणारी वैशिष्टे ही तत्कालीन राजकीय व्यवस्थेमध्ये प्राथमिक अवस्थेत आकाराला येत असल्याचे दिसते.

बुद्ध काळामध्ये महाजनपदे व गणराज्ये अस्तित्वात आल्याचे दिसते. बुद्धकालीन राजकीय व्यवस्थेमध्ये आजच्या आधुनिक लोकशाहीतील मूल्यांचा उद्गम शोधता येतो. त्यावेळी १६ महाजन पदे व १० गणराज्ये अस्तित्वात आली होती. गणराज्यामध्ये राजाची निवड ही वंश परंपरागत पद्धतीने न होता लोकांकडून राजा निवडून राज्यकारभार केला जात होता. बुद्धकालीन गणराज्य व्यवस्थेचे वर्णन डॉ.अमर्त्य सेन यांनी 'चर्चात्मक लोकशाही' असे केले आहे. यावरून असे म्हणता येईल की आजच्या भारतीय लोकशाहीच्या प्रेरणा प्राचीन काळापासून अस्तित्वात होत्या. या प्राचीन लोकशाही व्यवस्थेत भारतातील सहभागात्मक शासन, निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग, सामूहिक शहाणपणाचे तत्त्व आणि विचार मांडण्याचे स्वातंत्र्य ही लोकशाही मूल्ये अस्तित्वात होती.

**भारतातील आधुनिक लोकशाहीचा विकास :**

ब्रिटिश राजवटीपासून भारतात लोकशाहीला पुन्हा चालना मिळाली. ब्रिटिशांनी भारतात निवडणुका, न्यायव्यवस्था आणि मूलभूत अधिकार यांसारख्या इतर लोकशाही संस्थांची आणि संकल्पनांची पुनर्स्थापना केली. आधुनिक भारतीय लोकशाही व्यवस्थेची रुजुवात होण्यासाठी विशेषत: १७७३ सालच्या रेग्युलेटिंग कायद्या पासून सुरुवात झाली असे म्हणता येईल. या कायद्यान्वये बंगालचा गव्हर्नर हा गव्हर्नर जनरल झाला व त्यास सहाय्य करण्यासाठी चार सदस्यीय कार्यकारी मंडळ स्थापन करण्यात आले आणि याचेच रूपांतर आधुनिक लोकशाहीतील मंत्रिमंडळ नावाच्या मोठ्या राजकीय व्यवस्थेत झाल्याचे आपल्याला दिसते. त्याचबरोबर याच कायद्यान्वये सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करून आधुनिक न्याय मंडळाची पाया भरणी केली गेली. त्यानंतर आलेल्या विविध कायद्यांच्या द्वारे विविध लोकशाही संस्था, राजकीय व्यवस्था, निवडणुकीचे तत्व, नागरी सेवा, संघराज्यात्मक व्यवस्था, मताधिकार, कायदेमंडळे अशा विविध आधुनिक लोकशाही संस्था व मूल्ये निर्माण केली गेली. ब्रिटिश काळामध्ये घडलेल्या लोकशाहीसाठीचे पुनर्प्रयत्न व सुधारणा या प्रामुख्याने भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या व्यापक पार्श्वभूमीतून घडल्या आहेत. पुढे भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या संस्कारातूनच आधुनिक भारतीय लोकशाही खऱ्या अर्थाने सुस्थापित होण्यास सुरुवात झाली.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर सर्वप्रथम भारतीय घटनापरिषदेची स्थापना करून लोकशाहीत अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या सर्वसमावेशक राज्यघटनेची निर्मिती करण्यात आली. भारताची वाटचाल ही लोकशाहीच्या कोण- कोणत्या मूल्यांच्या आधारे होईल ही भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात स्पष्ट केले गेले व आजच्या सार्वभौम, लोकशाही, गणराज्य, धर्मनिरपेक्ष, समाजवादी लोकशाही देशाचा पाया रचला गेला.

**भारतीय लोकशाही समोरील आव्हाने :**

लोकशाही ही एकजीवपणे चालणारी प्रक्रिया आहे. लोकशाहीचा स्वीकार केला म्हणजे लोकशाही अस्तित्वात राहील असे होत नाही. त्यामुळे लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष राहावे लागते, जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. लोकशाहीला असणारे धोके वेळीच ओळखून त्यांचे लोकशाहीच्या मार्गानेच निराकरण करणे आवश्यक असते. प्रस्तुत मुद्यामध्ये आपण भारतीय लोकशाहीसमोर कोणती आव्हाने आहेत याचा प्रामुख्याने विचार आढावा घेणार आहोत.

तत्पूर्वी जागतिक पातळीवर लोकशाहीसमोरील आव्हानांचा आपण थोडक्यात विचार करू. आज जगातील प्रत्येक देश आपण लोकशाहीवादी असल्याचे म्हणतो. परंतु प्रत्यक्षात मात्र लोकांचे हक्क आणि स्वातंत्र्य अबाधित ठेवणारी आणि

जनकल्याणाला प्राधान्य देणारी लोकशाही फारच थोड्या देशांमध्ये आहे. लष्करी राजवटींचा मोठा धोका लोकशाहीसमोर आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर खऱ्या लोकशाहीचा प्रसार होणे व प्रत्येक देशात तिचा अवलंब हे लोकशाहीसमोरील मोठे आव्हान आहे. लोकशाही प्रसाराचे हे जागतिक पातळीवरील आव्हान आहे. ज्या देशांमध्ये लोकशाही रुजली आहे असे आपण म्हणतो तेथेही लोकशाहीचा वावर मर्यादितच आहे. अन्य देशांमध्येही लोकशाही म्हणजे केवळ मतदान, निवडणुका, शासनव्यवहार, न्यायालय इत्यादींचा बोध होतो. परंतु हे लोकशाहीचे केवळ राजकीय स्वरूप आहे. लोकशाही जर एक जीवनमार्ग व्हायचा असेल तर लोकशाही समाजाच्या विभिन्न क्षेत्रांत पोहचली पाहिजे. सर्व समाज घटकांचे सामीलीकरण, सामाजिक संस्थांना स्वायत्तता, नागरिकांचे सक्षमीकरण, मानवी मूल्यांचे जतन इत्यादी मार्ग त्यासाठी अवलंबावे लागतील.

खरी लोकशाही रुजवण्याचे हे कार्य पूर्ण होण्याची गरज आहे. लोकशाहीची पाळेमुळे आणखी खोलवर नेणे हे जगातल्या सर्वच लोकशाही राष्ट्रांपुढील मोठे आव्हान आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय, शांतता, विकास आणि मानवतावाद ही मूल्ये समाजाच्या सर्व स्तरांवर नेणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक व्यापक सहमतीही पुन्हा लोकशाही मार्गानेच निर्माण करता येणे शक्य आहे. लोकशाही खोलवर नेण्यासाठी या सुधारणांची आवश्यकता आहे.

उदारमतवादी लोकशाही संकल्पनेने औद्योगिक व विकसित अशा समाजात राजकीय व आर्थिक स्थैर्य निर्माण केलेले आहे. त्यामूळे विकसनशील व नवोदित देशांतही लोकशाही पद्धतीविषयी आकर्षण निर्माण झालेले आहे. आंतरराष्ट्रीय समाजात स्थान आणि प्रतिष्ठा मिळण्याच्या दृष्टिने सामान्य लोकांवरोवर नवोदित राज्यांनाही लोकशाहीचे महत्व वाटू लागलेले आहे. लोकशाही अधिक अर्थपूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने सत्तेचे विकेंद्रीकरण करणे व नागरीकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेणे आवश्यक आहे. लोकशाहीच्या अंतर्भूत मर्यादा व सामाजिक राजकीय परिस्थितीतून काही आव्हाने निर्माण झाली आहेत.

**संपत्तीचे केंद्रीकरण :**

भारताच्या आर्थिक परिस्थितीमध्ये झालेली सकल उत्पादनीय सुधारणा ही गांभीर्याने समजून घेणे आवश्यक आहे. येत्या काही वर्षांमध्ये पाच लाख कोटींची अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्था नावारूपाला येईल .त्यासाठी साधारण गणितीय ज्ञानाधारे लक्ष्यात येते कि ज्या विकासदराने भारतीय अर्थव्यवस्था विकसित होत आहे त्याप्रमाणे काही वर्षांमध्ये ती पाच लाख कोटींची अर्थव्यवस्था होईल.परंतु काही लाख कोटींची अर्थव्यवस्था होणे म्हणजे लोकशाहीला अभिप्रेत विकास होतो का ? तर त्याचे उत्तर नाही असे आहे .फ्रेंच अर्थतज्ञ थोमास पिकेटी व लुकास चान्सेल यांच्या २०१९ साली प्रसिद्ध झालेल्या "इंडियन इन्कम इनइक्व्यालीटी १९२२- २०१५- फ्रॉम ब्रिटीश राज टू बिल्लेनिअर राज " या संशोधनात त्यांनी भारतीय अर्थ व्यवस्थेतील विषमता व भारतीय समाजातील संपत्तीच्या केंद्रीकरणाची समस्या अभ्यासली आहे. त्यांच्या मते १ टक्के लोकांकडे २२ टक्के इतकी राष्ट्रीय संपत्ती केन्द्रीत झाली आहे .२२ टक्के संपत्तीदेशातील फक्त १ टक्के लोकांकडे असणे कदाचित आकडेवारीवरून असे वाटेल कि यामध्ये खूप काही गंभीर नाही परंतु लोकशाहीच्या दृष्टीने संपत्तीचे व्यस्त वितरण म्हणजे विषमता असते .संपत्तीचे केंद्रीकरण झाल्यास एकूण व्यवस्थेला आव्हान निर्माण होऊन लोकशाही व्यवस्थेमध्ये लोकांच्या सहभागावर मर्यादा येतात व लोकशाही व्यवस्था अस्थिर होऊ शकते. त्यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण न होऊ देता त्याचे योग्य व न्याय्य वितरण होणे लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

आर्थिक विषमतेबद्दल विचार करत असताना सॅम्युयल हंटींग्टन याने सांगितलेल्या 'दावोस मॅन' (Davos Man) या शब्दप्रयोगाचा उल्लेख करावासा वाटतो. दावोस मॅन (Davos Man) हा एक नवा शब्द हंटिंग्टन यांच्यामुळे प्रचलित झाला आहे. दावोस मॅन म्हणजे जागतिक उच्चभ्रू (Global Elite). ज्याला देशभक्ती, देशप्रेम वा राष्ट्रीय निष्ठेची जवळपास गरज नाही. त्याचा मते ज्या पद्धतीने राष्ट्रीय सीमा गळून पडत आहेत आणि कालांतराने त्या अदृश्य होतील. त्याचबरोबर शासन व्यवस्था, राष्ट्रीय सरकारे याही गोष्टी त्याला भूतकाळातील अवशेष वाटत आहेत, ज्याचे कार्य केवळ त्याच्या 'जागतिक पर्यटनाचे' व व्यवहारांचे नियंत्रण व नियमन करणे एवढेच आहे असे या दावोस मॅन ला वाटत असते. असे दावोस मॅन भारतीय समाजामध्ये निर्माण होण्याची प्रक्रिया गतीने सुरु झाल्याचे मला दिसते. अर्थात अशा निर्मितीबद्दल निरपेक्ष मत असणे कठीण आहे तरीदेखील भारतीय समाज व्यवस्था ज्या पद्धतीने एका संक्रमण अवस्थेमधून जाते आहे त्या वेळी याचा ही विचार करणे आवश्यक आहे. असा दावोस मॅन निर्माण होण्याची प्रक्रिया जर स्वातंत्र्य,समता, बंधुता व सामाजिक न्याय या संविधानिक व मानव मुक्तीच्या मूल्यांच्या प्रस्थापनेमधून पुढे आली असती तर कदाचित भारतीय तत्त्वज्ञानाच्या वसुधैव कुटुंबकम या उक्तीप्रमाणे ती मान्य करणे ही कठीण गेले नसते परंतु आर्थिक व सामाजिक विषमतेचा परिपाक म्हणून त्याची निर्मिती होताना दिसते आहे हे जास्त गंभीर आहे असे मला वाटते.

**संविधानिक व वैधानिक संस्थांचे खच्चीकरण :**

लोकशाही व्यवस्थेमध्ये आणि विशेषतःघटनात्मक लोकशाही मध्ये संविधानिक व वैधानिक संस्था या लोकशाही व्यवस्थेचे संरक्षक म्हणून कार्य करत असतात. अशा संस्थांचे दमन होणे किंवा त्यांच्या कार्य अधिकारांवर मर्यादा येणे हे लोकशाहीच्या दृष्टीने एक मोठे आव्हान निर्माण करणारे आहे . लोकशाही जरी लोकांच्या सहभागाने कार्यरत राहत असली तरी त्याचे अस्तिव टिकून राहण्यासाठी किमान संस्थात्मक व्यवस्था स्यायत्त पणे कार्यरत असणे आवश्यक असते. जर अशा संस्था स्वतंत्र व स्वायत्तपणे कार्यरत नसतील तर लोकशाही व्यवस्थेच्या अस्तित्वावर प्रश्न उभे रहात असतात . त्यासाठी जगातील अनेक लोकशाही देशांचे उदाहरण घेता येईल ज्यामध्ये प्रामुख्याने पाकिस्तान या देशात काय घडते आहे हे आपण पाहू शकतो. भारतीय संविधानिक संस्था कोणत्या राजकीय दबावापोटी आपल्या संविधानिक कर्तव्यात कसूर करून राजकीय नैतिकता बाजूला करून कारभार करत असताना लोकशाही व्यवस्थेच्या अस्तित्वाला धोका का निर्माण होणार नाही? राज्यशास्त्राच्या परिभाषेमध्ये ज्याला आपण 'लिगल ओब्लीगेशन' म्हणजे कायद्याचे बंधन म्हणतो त्याचेच पालन होत नसेल तर नागरी समाजाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असणाऱ्या 'पोलिटिकल ओब्लीगेशन' म्हणजे राजकीय बंधनाचे काय? ज्यामध्ये कायदेशीर कर्तव्याबरोबर नैतिक मर्यादांचे पालन करावे लागते. कोणत्याही व्यवस्थेच्या अस्तित्वाच्या आधारशीला या त्या व्यवस्थेच्या नैतिक अधिष्ठान किती मजबूत आहे यामध्ये सामावलेली असते. आपल्या संविधानकर्त्यांनी एक जैविक व सर्वसमावेशक राज्यघटना आपल्या हाती दिली परंतु त्याचा डोलारा हा आपल्या नैतिक कृतींवर उभा असतो. त्याचमुळे लोकशाही व्यवस्थेमधील संविधानिक संस्था वा कोणत्याही कायद्याने प्रस्थापित झालेल्या सार्वजनिक संस्थां या कायद्याच्या बंधनापलीकडे जावून राजकीय बंधनाच्या तत्वाला आत्मसात करणे आवश्यक ठरते. अन्यथा प्रक्रियात्मक लोकशाही राबिवली जाते व लोकशाहीच्या मुलभूत तत्वांना बाजूला सारून उदात्त मानवी मूल्यहीन व्यवस्था जन्माला येते.

**जमातवाद :**

भारतीय लोकशाहीमध्ये धार्मिक कट्टरता जमातवादाच्या रूपात एक मोठे आव्हान आहे. कोणत्याही लोकशाही मध्ये जमातवादी प्रवृत्ती ही लोकशाहीच्या विकासाला व कालांतराने अस्तित्वाला धोका निर्माण करणारी असते. जमातवादामध्ये 'आपले आणि परके' असा 'इतरीकरणाचा' भाव जन्माला येतो आणि लोकशाहीचा गाभा असणाऱ्या सर्वसमावेशकतेच्या मुल्याचे हनन व्हायला सुरुवात होते . उदाहरणार्थ मणिपूर येथील मैतेई आणि कुकी समाजातील अंतर्गत हिंसाचाराच्या घटना म्हणजे लोकशाही व्यवस्थेलाच तिलांजली दिली गेल्याचे म्हणता येईल. दोन समुदायातील हिंसक व द्वेषपूर्ण संघर्ष हे लोकशाहीला मोठे आव्हान निर्माण करतात. शांततामय सह अस्तित्व हे लोकशाही व्यवस्थेचे प्रमुख मूल्य आहे. परंतु परस्पर सहकार्याच्या भूमिकेऐवजी परस्पर द्वेषाच्या भावनेने जागा घेतली तर लोकशाही व्यवस्था बळकट तर होणार नाहीच परंतु त्याच्या अस्तित्वाला धोका निर्माण होईल. मणिपूर मध्ये जी परिस्थिती तयार झाली होती ती एक प्रकारे 'Absentee Democracy' म्हणजेच 'अनुपस्थित लोकशाही' होती. व्यवस्था म्हणून लोकशाही चे अस्तित्व होते परंतु लोकशाही मुल्यांची वा लोकशाहीने दिलेल्या संरक्षणाची हमी मात्र गायब होती. अशा परिस्थिती मध्ये मणिपूर सारख्या घटना इतरत्र ही घडू शकतात आणि म्हणून आपण जमातवादाच्या आव्हानाला गांभीर्याने घेणे आवश्यक आहे असे मला वाटते.

**जातीवाद :**

भारतीय लोकशाहीमध्ये जात हा घटक अत्यंत महत्वपूर्ण ठरलेला आहे. निवडणुकीमध्ये उमेदवारांच्या निवडीपासून ते मंत्रिमंडळातील स्थान निश्चिती पर्यंत जात या घटकाने प्रभावशाली भूमिका बजावली असलयाचे आपल्याला दिसते. मतदान करत असताना उमेदवारांच्या गुणात्मक वैशिष्ट्ये लक्ष्यात न घेता त्याची जात प्राधान्याने पाहिली जाते त्यामूळे लोकशाही व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर परिणाम होते. जातीवादामुळे भारतीय संविधानाने सांगितलेले व्यक्तिमूल्य व व्यक्तीची प्रतिष्ठा राखली जात नाही. जातीवादी प्रवृत्ती ही समाजामध्ये अस्वस्थता व असहकार्य निर्माण करते व त्याचा थेट परिणाम भारतीय लोकशाहीवर होतो. त्यामुळे जातीवाद हे एक मोठे आव्हान भारतीय लोकशाहीसमोर आहे.

**प्रांतवाद :**

भारत हा एक खंडप्राय देश आहे त्यामुळे प्रादेशिक समतोल साधण्याकरता घटक राज्यव्यवस्था निर्माण केली गेली. परंतु अजूनही प्रादेशिक असमतोल किंवा प्रांतवाद कमी झाला नाही. उत्तर भारत व दक्षिण भारत असा एक वाद कायम चर्चेत असल्याचे आपल्याला दिसते. उत्तर प्रदेश, बिहार येथील लोकाना रोजगारासाठी महाराष्ट्र , गुजरात , कर्नाटक अशा विकसित राज्यांमध्ये स्थलांतरित व्हावे लागते परंतु अश्या स्थलांतरित लोकाना विविध समस्याना तोंड द्यावे लागते . त्यांची

प्रदेशावरून त्यांना भेदभावाचा सामना करावा लागतो . कित्येक वेळेला त्यांच्या विरुद्ध हिंसा झाल्याच्या बातम्या आपण पाहतो. अशावेळी प्रांतवादामुळे भारताच्या एकता आणि अखंडतेला इजा पोहचते. प्रांतवादामुळे घटक राज्यांमध्ये विखारी स्पर्धा सुरू होते आणि अशा स्पर्धेतून राज्य एकमेकाना विरोध करू लागतात त्यामुळे लोकांच्या मूलभूत समस्या बाजूला राहून दोन राज्यांमधील प्रतिष्ठेच्या संघर्षाला सुरुवात होते त्यामुळे लोकशाही कमकुवत होते. प्रांतवादाच्या प्रवृत्तीमुळे विविध प्रश्नावरून वाद निर्माण होत आहेत. उदाहरणार्थ कर्नाटक व तमिळनाडू मध्ये असणार कावेरी नदी च्या पाणी वाटपाचा वाद. पाणी हे सर्वांसाठी मूलभूत गरज असली तरी माझ्या प्रांतातील लोकांचा त्यावर जास्त अधिकार आहे अशी भूमिका ही लोकशाहीला मारक ठरते.

**भाषावाद:**

भारतामध्ये भाषिक विविधता आहे. विविध राज्यांमध्ये असंख्य भाषा, बोली बोलल्या जातात. भारतामध्ये भाषेचा अभिमान बाळगला जातो त्यातून 'भाषिक श्रेष्ठत्व' या मूल्याला बळ मिळते. आमचीच भाषा श्रेष्ठ अशी भूमिका घेतल्याने इतर भाषिक लोकांचा द्वेष केला जातो. ठराविक राज्यामध्ये ठराविकच भाषा बोलली पाहिजे असा आग्रह धरला जातो त्यामुळे भारतीय समाजातील विविधतेच्या संस्कृतीला आव्हान उभे राहते व कालांतराने लोकशाही व्यवस्थेपुढील आव्हान म्हणून भाषावाद विकसित होतो.

**दहशतवाद :**

धार्मिक संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारा दहशतवाद हे भारतीय लोकशाहीसमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे. समाजात धार्मिक तेढ वाढल्यामुळे सामाजिक स्थैर्य नाहीसे होते. दहशतवादामुळे लोकशाहीत प्राप्त होणाऱ्या मानवी अधिकारांचे हनन होते. समाजात अशांतता व असंतोष पासरविण्याचे काम दहशतवादी करत असतात. भारतीय लोकशाहीने निर्माण केलेली राजकीय व्यवस्था अस्थिर करून भारतामध्ये अराजकता माजवणे हा मुख्य उद्देश ठेवून दहशतवादी क्रिया करत असतात. दहशतवादासारख्या घटनांमुळे लोकांचा लोकशाहीतील सहभाग कमी होतो.

**नक्षलवाद :**

नक्षलवाद ही भारतातील खूप मोठी समस्या आहे. भूमिहीन शेतकरी, आदिवासी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला दूर करण्यासाठी नक्षलवाद सुरू झाला. या नक्षलवादाने आता उग्र रूप धारण केले आहे. पण यातील शेतकरी-आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व कमी होऊन सरकारला हिंसक पद्धतीने विरोध करणे, पोलीसदलांवर हल्ले करणे, यांसारख्या मार्गांचा वापर नक्षलवादी गटांकडून केला जातो.नक्षलवादी गटाकडून आपल्याच नागरिकांच्या कत्तली करून सरकारविरोधी कृत्य करायला भाग पाडले जाते त्यामुळे भारताच्या राष्ट्रीय अखंडतेला मोठे आव्हान उभे राहिले आहे .

**भ्रष्टाचार :**

भारतामध्ये सार्वजनिक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराची समस्या दिसून येते. राजकीय आणि प्रशासकीय स्तरावरील भ्रष्टाचारामुळे सरकारची कार्यक्षमता कमी होते. सरकारी कामांना लागणारा वेळ, सार्वजनिक सोई व सुविधांची घसरलेली गुणवत्ता, वेगवेगळे आर्थिक घोटाळे यांमुळे एकूण व्यवस्थेबद्दल अविश्वास आणि असमाधानाची भावना लोकांमध्ये निर्माण होते. निवडणूक प्रक्रियेमध्ये होणारा भ्रष्टाचार, बनावट मतदान, मतदारांना लाच देणे, पळवून नेणे यांसारख्या घटनांमुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास उडू शकतो. भ्रष्टाचारही देशाच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक दृष्टीने गंभीर समस्या आहे. या समस्येतून जो पर्यन्त आपण बाहेर पडणार नाही तो पर्यन्त देशाची सर्वंकष प्रगती होणे शक्य नाही. भारतात असे एकही क्षेत्र आढळत नाही जिथे भ्रष्टाचार नाही . भ्रष्टाचारांमुळे भारतीय लोकशाहीसमोर गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण :**

राजकीय प्रक्रियेमध्ये गुन्हेगारांचा वाढता सहभाग ही लोकशाही व्यवस्थेसमोरील एक गंभीर समस्या आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी, गुन्हेगारी स्वरूपाचे आरोप, भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या व्यक्तींना काही वेळा राजकीय पक्षांकडून उमेदवारी दिली जाते. त्यामुळे राजकारणामध्ये पैसा आणि गुंडगिरी यांचे महत्त्व वाढते. निवडणुकीच्या वेळी हिंसाचाराचा वापर होऊ शकतो. सत्ताप्राप्तीच्या साठमारीत विचारप्रणालीच्या राजकारणाचा दारुण पराभव होतो. राजकारणामध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीच्या वाढत्या आलेखांमुळे त्याचा थेट परिणाम राजकारणातील लोक सहभागावर होताना दिसते . चांगले, कार्यक्षम लोक राजकरणांतील गुन्हेगारी मुळे सहभाग घेण्यास नकार देतात व सत्ता ही गुन्हेगारांच्या हातातील खेळणे बनते अशा वेळी लोकशाही समोर मोठे आव्हान उभे राहते.

**लोकांमधील जागरूकतेचा अभाव :**

लोकशाहीच्या यज्ञासाठी सामान्य जनता सतत जागरूक असणे आवश्यक आहे. अखंड जागरूकता ही लोकशाहीसाठी किंमती आहे. प्रतिनिधीक लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींवर सतत लक्ष ठेवूनच त्यांना लोकमताच्या मार्गावर ठेवता येते. जागरूक लोकच असे नियंत्रण ठेऊ शकतील. तेच जर निष्क्रिय व बेफिकीर राहिले तर सत्तेची साधने जवळ असल्याने लोकप्रतिनिधी आपल्या हिताचेच रक्षण करतील हा लोकशाही व्यवस्थेपुढील महत्वाचा प्रश्न आहे मतदानाचा हक्क हे लोकांच्या हातात असलेले हत्यार आहे. त्याचा लोकांनी जागरूकपणे वापर करण्यावरच लोकशाहीचे यश अवलंबून आहे. लोकांनाच लोकशाही विषयी आस्था नसेल किंवा ईर्षा नसेल तर लोकशाहीला भविष्य राहणार नाही.

**लोकसहभागाच्या मर्यादा :**

लोकसहभागावर लोकशाहीचा जीवंतपणा अवलंबून असतो लोकसहभाग वाढविण्यासाठी समाजात सर्व क्षेत्रात समानता असणे आवश्यक आहे. समाज रचनेत समतल रचना असल्यास सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रकियांचे क्षेत्र वाढू शकते आणि त्यांचा लोकांवर अधिक प्रभाव पडत असल्याने लोकांची लोकशाहीविषयी आस्था अधिक वाढेल.

लोकशाही व्यवस्थेमध्ये सर्वात महत्वाची प्रक्रिया असते ती म्हणजे निवडणूक व मतदान प्रक्रिया .कोणत्याही देशाची लोकशाही व्यवस्था व त्याची विश्वासार्हता ही तेथील निवडणूक व मतदान प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर अवलंबून असते .मतदान प्रक्रिया जर पार दर्शक नसेल तर लोकशाहीच्या दृष्टीने ती अतिशय गंभीर बाब आहे. लोकशाही ज्या नैतिक अधिष्ठानावर अवलंबून आहे त्यापैकी मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता ही बाब अत्यंत महत्वाची आहे. भारतीय निवडणूक प्रक्रिया १९५२ सालापासून अतिशय कार्यक्षमतेने व बहुतेक वेळा पारदर्शक पणे कार्यरत असल्याचे दिसते. परंतु भारतीय निवडणूक प्रक्रियेत १९८२ साली इ.व्ही.एम. मशीन चा वापर सुरु झाला तेंव्हापासून मतदान प्रक्रियेच्या पारदर्शक्तेबद्दल प्रश्न उपस्थित होत आहेत्त.परंतु इ.व्ही.एम. मशीन च्या वापरामुळे मतदान प्रक्रिया अपारदर्शक झाली आहे किंवा त्याचा गैरवापर करता येऊ शकते यासाठीचे सबळ पुरावे कोणीही सदर केल्याचे दिसत नाही. तरीही या अनुषंगाने एक बाब लक्ष्यात घेण्यासारखी आहे ती म्हणजे मतदान प्रक्रीयेबद्दल निर्माण होणारी प्रत्येक शंका ही स्पष्टपणे व पारदर्शी पद्धतीने त्याचे निरसन करणे आवश्यक आहे अन्यथा लोकांचा प्रक्रियेवरचा विश्वास कमी झाल्यास लोकशाही व्यवस्थेच्या अस्तित्वाला आव्हान उभे राहू शकते.

**प्रसार माध्यमांची भूमिका:**

माध्यमे हा लोकशाहीतील चौथा स्तंभ मानला जातो. अर्थात लोकशाहीचा असा स्थंभ अपेक्षित नव्हता पण माध्यमांची, विषेशतः प्रामाणिक, तटस्थ माध्यमांची आवश्यकता लोकशाही मध्ये महत्वपूर्ण असते. मात्र, भारतात माध्यम स्वातंत्र्यच्या अधिकाराबद्दल आज गंभीर प्रश्न उभे राहिल्याचे दिसते . आजची परस्थिती पाहता लोकशाहीचा हा चौथा स्थंभ असा शब्द प्रयोग विचारपूर्वक नव्हे तर उत्साहाच्या भरातच केला गेला असावा असे माझे मत झाले आहे. जगभरातील लोकशाही देशांची परिस्थिती पाहता माझे वरील मत अधिक पटेल. अपवाद वगळता माध्यमे आपली जबाबदारी चोख पार पाडताना दिसत नाहीत. तरीदेखील मला असे वाटते कि निव्वळ माध्यमाना दोष देवून नागरीक म्हणून आपण आपल्या जबाबदारीपासून दूर जावू शकत नाही. एक शिक्षक, अभियंता, डॉक्टर, वकील, कलाकार, उद्योजक अशा इतर कोणत्याही भूमिकेत आपण काम करत असू तरी आपली सुद्धा लोकशाहीच्या दृष्टीने एक महत्वाची कमीटमेंट असली पाहिजे. फार काही नाही फक्त आपल्याला दिलेल्या जबाबदाऱ्या प्रामाणिक आणि नैतिकतेने पार पाडणे इतकी साधी गोष्ट जरी आपण केली तर तीसुद्धा लोकशाही व्यवस्थेच्या बळकटीस पूरक ठरेल.

प्रसार माध्यमांच्या एकूण भूमिकेबद्दल विचार करताना मला असे वाटते की लोकशाही व्यवस्थेमध्ये माध्यमे ही चिकित्सक भूमिका बजावत असतात. माध्यमांची गळचेपी होऊन जर माध्यमे प्रपोगंडा चालवणारी यंत्रणा झाली तर त्याचे गंभीर परिणाम लोकशाहीला भोगावे लागू शकतात. १९३०च्या दशकात जर्मनी मध्ये हिटलर ने केलेल्या नरसंहाराला काही अंशी प्रसार माध्यमे जबाबदार ठरली असे म्हणता येते. एखाद्या समुदायाबद्दल द्वेषपूर्ण चित्रण माध्यमांमधून होत असेल तर त्या समाजात भीतीचे व अस्थिरतेचे वातावरण निर्माण होते व त्यातूनच लोकशाही व्यवस्थेच्या एक व्यक्ती एक मुल्य या मुलभूत सिद्धांताला आव्हान मिळते. माध्यमे ही समाजाचा आरसा बनून कार्यरत असणे आवश्यक असते अन्यथा लोकशाही व्यवस्था पूर्ण कार्यक्षमतेने कार्यरत राहू शकत नाही.

**समारोप :**

भारतीय लोकशाही समोरील विविध आव्हानांचा उल्लेख जरी मी माझ्या संपूर्ण लेखामध्ये केला असला तरी अनेक आव्हाने ज्यांची नोंद माझ्या लेखामध्ये आलेली नाही याची मला जाणीव आहे. परंतु इतरही आव्हाने तितकीच गंभीर आणि चिंताजनक असल्याचे माझे मत आहे. भारतीय लोकशाही बद्दल अनेक अभ्यासकांनी प्रश्न उपस्थित केलेले होते,

आजही करत आहेत.तरी देखील भारतीय लोकशाही विविध विसंगतींना सामावून यशस्वीपणे वाटचाल करत असल्याचे आपल्याला दिसते. भारतीय लोकशाही ही एक विसंगती पूर्ण व्यवस्था जरी असली तरी देखील भारतीय संविधानाने जी दिशा भारतीय लोकशाहीला दिलेली आहे त्यामुळे या सर्व विसंगतींवर मात करून भारतीय लोकशाहीची वाटचाल सुरू असल्याचे दिसते. परंतु भारतीय लोकशाही जर खऱ्या अर्थाने यशस्वी करायची असेल तर नागरिक म्हणून आपण प्रत्येकाने जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे. भारतीय लोकशाही जगातील सर्वात जुनी लोकशाही नसली तरी जगातील सर्वात कार्यक्षम लोकशाही व्यवस्था म्हणून आकाराला येण्यासाठी आपल्याला अथक परिश्रम व काळजी घेणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची :**

1)Adeney, K., & Wyatt, A. (2004). "Democracy in South Asia: Getting beyond the Structure-Agency Dichotomy" Political Studies.

2)Nepali Rohit Kumar, (2009), "Democracy in South Asia", International Institute for Democracy and Electoral Assistance.

3)Chancel Lucas,Picketty Thomas,(2019), "Indian Income Inequality 1922-2015- From British Raj to Billionaire Raj "IARIW.

4) यादव योगेंद्र,पळशीकर सुहास,डिसुझा पीटर,(२०१०) "लोकशाही जिंदाबाद – भारतीय उपखंडातील वैशिष्टेपूर्ण लोकशाहीचा शोध", अनु – सोनवणे मनोहर , समकालीन प्रकाशन पुणे.

5) पळशीकर सुहास, (२०१४) 'देश-प्रदेश: प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा', युनिक अकॅडेमी.

6)पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास, सहावी आवृत्ती (2019), 'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष: राजकीय पक्षांची वाटचाल', समकालीन प्रकाशन, पुणे.

7)पळशीकर सुहास, (2013)," राजकारणाचा ताळेबंद: भारतीय लोकशाहीची वाटचाल, साधना प्रकाशन, पुणे.